मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
दालन क्र. ४३६, मंत्रालय विस्तार भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई -४०००३२

E-MailD : tnt2.sesd-mh@gov.in

क्रमांक : न्यायाप्र-२०२४/प्र.क्र.१६७/टिएनटी-२ दिनांक :-१२.०७.२०२४

**प्रति,**

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

**विषय:- शासन निर्णय दि.१५.०३.२०२४ नुसार संचमान्यता व समायोजनाची कार्यवाही विहीत मुदतीत करणेबाबत.**

मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका .२८५२/२०२४ व ५४७२/२०२४ मधील मा. उच्च न्यायालयाचे दि.१२.०६.२०२४ रोजीचे आदेश.

मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र.२८५२/२०२४ व रिट याचिका क्र.५४७२/२०२४ मधील दि.१२.०६.२०२४ रोजीच्या आदेशान्वये मा. न्यायालयाने रिट याचिका क्र.२८९६/२०२४ मधील दि.१५.०३.२०२४ रोजीच्या आदेशातील परिच्छेद ५ मध्ये दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याबाबत निर्देशीत केले आहे.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शासन निर्णय दि.१५.०३.२०२४ अन्वये संचमान्यतेचे सुधारित निकष विहीत करण्यात आले आहेत. तसेच, राज्यातील खाजगी अनुदानित/अंशत: अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व अध्यापक विद्यालयातील व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळेतील अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे समायोजनासंदर्भात दि.१५.०३.२०२४ च्या शासन निर्णयान्वये सुधारित निकष विहीत करुन ३० सप्टेंबर रोजीचा आधार वैध पट विचारात घेवुन संचमान्यता व समायोजन करण्याची कार्यवाही करण्यासाठी विहीत कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार संचमान्यता व समायोजनाची कार्यवाही विहीत कालमर्यादेत करण्याबाबत आपल्या स्तरावरुन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, ही विनंती.

(तुषार महाजन)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.